दिनांक :- ०९-०१-२०२६

तरुण भारत संवाद शुक्रवार, ९ जानेवारी २०२६

# 'विवेकानंद'मध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी

कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष आणि महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ व १० जानेवारी रोजी हिंदी गीत और गझल : विविध परिदृश्य या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली, संस्थेच्या सचिव

- **महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ वे अधिवेशनही होणार**

प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी, डॉ. वसंत मोरे, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर खराटे, डॉ. पांडुरंग पाटील, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

चर्चासत्राचे बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण हे हिंदी गीत और गझल या विषयावर मार्गदर्शन करतील. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात हिंदी गीत और गझल सामाजिक परिदृश्य् या विषयावर डॉ. पंढरीनाथ पाटील, डॉ. देवीदास बामणे, डॉ. नाजिम शेख मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात हिंदी गीत और गजल : राजनीतीक एवं आर्थिक परिदृश्य् या विषयावर डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ सुरेश शेळके, डॉ विठ्ठलसिंह ढाकरे हे मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रामध्ये हिंदी गीत और गझल : नारी विषयक परिदृश्य् या विषयावर डॉ. विद्या शिंदे, डॉ. प्रतिभा येरेकर, डॉ. अरुण घोगरे, डॉ. शाहीन पटेल हे मार्गदर्शन करणार आहेत. चौथ्या सत्रात हिंदी गीत और गझल : धार्मिक एवं सांस्कृतिक परिदृश्य् या विषयावर डॉ. साताप्पा चव्हाण, डॉ. मिथिलेश अवस्थी, डॉ. हाशमबेग मिर्झा, डॉ. गोविंद बुरसे हे मार्गदर्शन करणार आहेत. तर पाचव्या सत्रात हिंदी गीत और गझल : अन्यान्य् परिदृश्य् या विषयावर डॉ. सुनिल बनसोडे, डॉ. सातापा सावंत, डॉ. दीपक पवार, डॉ. जालिंदर इंगळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी शुक्रवार, ९ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये आजपासून महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अधिवेशन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष व महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ व १० जानेवारी रोजी 'हिंदी गीत और गजल विविध परिदृश्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पुण्य नगरी

शुक्रवार, ९ जानेवारी २०२६ | कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजमध्ये चर्चासत्राचे आयोजन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे अधिवेशन दि. ९ व १० जानेवारी रोजी होईल. अधिवेशनामध्ये 'हिंदी गीत और गझल विविध परिदृश्य' या विषयावरील चर्चासत्राचे उद्‌घाटन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, डॉ. इरेश स्वामी आदींच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे.